स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यपदी विद्यापीठ कर्मचाऱ्यांमधून सुरेखा पाटील, महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांमधून डॉ. ऋषीकेश चित्तम आणि नगरपालिकेच्या सदस्यांमधून अंबिका शेंडे यांची कुलगुरूंनी नियुक्ती केली आहे.

विद्यापीठाच्या अधिसेभेवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या २८ (२) (V) आणि (Y) अन्वये कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी ही नियुक्ती केली आहे. विद्यापीठाच्या अध्यापकेतर कर्मचाऱ्यांमधून वरिष्ठ सहायक, सुरेखा पाटील यांची अधिसभा सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्या विद्यापीठाच्या वित्त विभागात कार्यरत आहेत. विद्यापीठाला कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे नाव दिल्यानंतर अस्तित्वात येणाऱ्या पहिल्या प्राधिकरणात विद्यापीठ कर्मचाऱ्यांमधून कुलगुरूंनी महिलादिनी सुरेखा पाटील यांची नियुक्ती केली आहे. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील अध्यापकेतर कर्मचाऱ्यांमधून डॉ. ऋषीकेश चित्तम यांची नियुक्ती करण्यात आली आहे ते कै. आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे येथे प्रयोगशाळा परिचर म्हणून कार्यरत आहेत. नगरपालिकेतील एका सदस्यांमधून एक वर्षासाठी अधिसभेवर सदस्य म्हणून कुलगुरू नामनिर्देशन करतात. तळोदा, जि. नंदुरबार येथील नगरपालिका सदस्य अंबिका शेंडे यांची कुलगुरूंनी अधिसभा सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. ९ (प्रतिनिधी) राष्ट्रीय जनजाती आयोगाच्यावतीने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि आदिवासी अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार दि. ९ मार्च रोजी जनजाती वक्ता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षण वर्गासाठी संलग्नित महाविद्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्घाटन समारंभास प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय जनजाती आयोगाचे वैभव सुरंगे उपस्थित होते. मंचावर आदिवासी अकादमीचे प्रभारी संचालक प्रा. किशोर पवार, जितेंद्र महाजन उपस्थित होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात जनजातीमधील अनेकांचे मोठे योगदान होते. तो इतिहास तरूण पिढीसमोर यावा म्हणून आयोगामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात असून विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी स्थानिक इतिहासाचा शोध विद्यार्थ्यांकरवी घ्यावा असे आवाहन प्रा. इंगळे यांनी केले. वैभव सुरंगे यांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षात जनजातीमधील दुर्लक्षित महानायकांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान कळावे यासाठी देशभरातील १०१ विद्यापीठांमध्ये या वर्षभरात कार्यक्रम घेण्यात आले असे सांगून जनजातीमधील अनेक नायकांविषयी माहिती दिली. जनजातीचा इतिहास, कायदे, सरकारच्या योजना याविषयीची माहिती पोहचावी यासाठी जनजाती वक्ता प्रशिक्षण वर्ग घेतले जात आहेत. यातून उत्तम वक्ते घडतील आणि ते या योजनांची माहिती लोकांपर्यत पोहचवतील असे सुरंगे म्हणाले. प्रारंभी विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. सुनील कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात आयोजनामागील भुमिका स्पष्ट केली. दिवसभराच्या सत्रात किशोर चौधरी, जितेंद्र महाजन, विठ्ठल म्याकलवाड यांनी मार्गदर्शन केले. अधिसभा सदस्य प्रा. मंदा गावित, प्रा. विशाल पराते, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वसंत वळवी यांनी केले.

# जनसंपर्क विभाग

**बातमी क्रमांक ३**

जळगाव दि.९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेत युजीसी सॅप डीआरएस च्या संशोधन बळकटीकरण योजनेअंतर्गत दोन दिवसीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या वेबिनारमध्ये २६५ विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापकांनी भाग घेतला. प्रा. खुर्रम मुस्तफा (नवी दिल्ली), प्रा. तन्वीर खान (पुणे), प्रा. निशित जोशी (जयपुर), प्रा. शिवानंद गोरनाळे (बेळगाव), प्रा. आर. जे. रामटेके (कबचौउमवि, जळगाव) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी वेबिनारचे ऑनलाईन उद्घाटन केले. आयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. बी. व्ही. पवार, प्रशाळेचे संचालक प्रा. सतिष कोल्हे, समन्वयक प्रा. आर. जे. रामटेके, प्रा. आरती भावसार, प्रा. स्नेहलता शिरूडे, कविता पाटील, शुभांगी सपकाळे यांनी यशस्वीपणे या वेबिनारचे आयोजन केले.

**बातमी क्रमांक ४**

जळगाव दि. ९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्र सामाजिकशास्त्र प्रशाळा आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला जागर सप्ताह: आत्मनिर्भर युवती अभियानाला ८ मार्च पासून प्रारंभ झाला.

पहिल्या दिवशी विद्यापीठात डॉ. सोमनाथ वडनेरे यांनी सोशल मिडीयाच्या अनुषंगाने सविस्तर माहिती दिली. हे माध्यम वापरतांना महिलांनी घ्यावयाची काळजी पासवर्ड सुरक्षा याबद्दल त्यांनी सविस्तर विवेचन केले. डॉ. प्रियंका पाटील यांनी अध्यक्षीय समारोपात महिला सक्षमीकरणाची गरज स्पष्ट केली. स्त्री अभ्यास केंद्राच्या प्रमुख डॉ. संजिवनी भालसिंग, समन्वयक डॉ. विश्रांती मुंजेवार, सहसमन्वयक भाग्यश्री पाटील यांची उपस्थिती होती.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ९ मार्च, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी